




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : २१२ ● पुणे ● शुक्रवार, दि. ०४ जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




मोरे यांच्या चक्काजाम नंतर नऱ्हे बदलताना दिसतंय


3



धायरीत शनिवारी भव्य जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन

4

## ठळक बातम्या



### कात्रज घाटात कारला भीषण आग

कात्रज (आरंभ पर्व) : पुणे -सातारा मार्गावरील कात्रज जुन्या घाटात हुंडई क्रेटा कार (MH 12 QT 3520) ला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कात्रज बोगद्याजवळ असलेल्या ओमकार फर्निचर दुकानासमोर आज (दि. ०३) रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेत सुदैवाने गाडीतील सर्व सहा प्रवाशांचा जीव वाचला, आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. पुण्यातील सॅलिसबरी पार्क येथील रहिवासी मुन्नावर अली खान हे आपल्या कुटुंबासह महाबळेश्वर येथील सहलीवरून परतत होते. खेड-शिवापूर येथे इंधन भरल्यानंतर कात्रज घाटात प्रवेश करताच, बोगद्याजवळ त्यांच्या गाडीच्या बोनेटमधून धूर निघत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. मुन्नावर यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ गाडी थांबवली आणि गाडीतील पाच जणांसह स्वत: बाहेर पडले. यामुळे मोठी दुर्घटना टळली, आणि सर्व प्रवासी सुखरूप राहिले.

### उपनिरीक्षकाचे वाहतूक नियमन

पुणे (आरंभ पर्व) :मद्यप्राशन करून कर्तव्यावर आलेल्या श्रेणी पोलिस उपनिरीक्षकावर लष्कर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर, त्यांचे पोलिस खात्यातून निलंबन करण्यात आले आहे. संजय सुधाकर माटेकर असे निलंबीत करण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षकांचे नाव आहे. याबाबतचे आदेश वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिले आहेत. श्रेणी पोलिस उपनिरीक्षक माटेकर हे लष्कर वाहतूक विभागात नेमणूकीस आहेत. ते २९ जुलै रोजी रात्री एक वाजताच्या सुमारास ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह (डी. डी) कारवाईसाठी कर्तव्यावर होते. त्यांनी कारवाईसाठी एक चारचाकी गाडी थांबविली. गाडीतील तिघा व्यक्तींसोबत वाद घातला. दरम्यान, यावेळी माटेकर यांनी मद्यपान केले होते. हा प्रकार समोर आल्यानंतर माटेकर यांच्या विरुद्ध कर्तव्याच्या ठिकाणी मद्याचे सेवन केल्यामुळे लष्कर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माटेकर यांनी कर्तव्य पार पाडत असताना,बेशिस्त बेजबाबदारपनाचे व पोलिस खात्यात अशोभनिय असे गैरवर्तन करून अत्यंत गंभीर स्वरुपाची कसूरी केल्याने, पोलिस खात्याची प्रतिमा मलिन झाल्याचा ठपका ठेवत त्यांना निलंबीत करण्यात आले आहे.

### हाताचा पंजा मनगटापासून तोडला

पुणे (आरंभ पर्व) : पुर्ववैमन्सातून एका १७ वर्षाच्या मुलावर तिघांनी कोयत्याने डोक्यात, पाठीवर वार करुन हाताचा पंजा मनगटापासून वेगळा केला आहे. अभिषेक गणेश दोरास्वामी (१७ , रा. हडपसर) असे जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे.

# स्वतंत्र महानगरपालिकेची निर्मिती करावी

## आ. योगेश टिळेकर यांची विधान परिषदेत मागणी

**हडपसर (दै. आरंभ पर्व)**

नव्याने समाविष्ट आणि हडपसर-वाघोली अशी पुण्याच्या पूर्व भागातील गावांची एकत्रित महानगरपालिका निर्माण करण्याची मागणी विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी लक्षवेधीद्वारे आज विधान परिषदेत केली आहे. वाढत्या नागरिकरणामुळे या समाविष्ट गावांना सुविधा पुरवण्यात महानगर पालिकेची कसरत होत असून आर्थिक अडचणीही निर्माण होत आहेत. त्यामुळे शहराच्या पूर्व भागातील हडपसर-मांजरी-वाघोली आणि त्या लगतच्या गावांची एकत्रितपणे स्वतंत्र महानगर पालिका करण्याची मागणी आमदार टिळेकर यांच्याकडून करण्यात आली आहे.

अधिक माहिती देताना आमदार योगेश टिळेकर म्हणाले की "पुणे शहराच्या हद्दीलगत असलेल्या ३२ गावांचा पुणे महापालिकेत समावेश झाल्यामुळे पुणे महापालिका प्रशासनावरील ताणही प्रचंड वाढला आहे. पुणे शहराचा चोहोबाजूंनी होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे शहराचे व्यवस्थापन करणे महापालिकेला अवघड होत आहे. त्यामुळे नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविणे महापालिकेला अशक्य होत आहे. वाढलेली हद्द आणि अपुरी प्रशासकीय व्यवस्था यामुळे महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमधील प्रश्न सुटत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

पुणे महापालिकेत पूर्वी असलेल्या भागामध्ये आवश्यक त्या सुविधा पुरविणेच अवघड असताना नवीन समाविष्ट गावातील नागरिकांनाही सोयीसुविधा देण्याची जबाबदारी महापालिकेवर येवून पडली आहे. नवीन गावांमध्ये नियमबाह्य बांधकामे एक ते दीड गुंठ्यामध्ये चार ते पाच मजली उभ्या राहिलेल्या इमारती ही बांधकामे पालिकेत येण्यापूर्वीची असल्याने त्यावर पालिकेला कारवाई करताना अडचण निर्माण होत आहे.

शहराच्या पूर्व भागांत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले आहे. इथे राहणाऱ्या नागरिकांना अनेक



समस्यांना सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे पुणे महापालिकेचे विभाजन करून नवीन महापालिका केल्यास अनेक समस्या मार्गी लागतील आणि या भागाचा नियोजनबद्ध विकास करता येईल यासाठी पुणे महानगर पालिकेचे विभाजन करून पूर्व पुण्यासाठी नवीन महानगर पालिका निर्माण करण्याची आवश्यकता आहे.राज्य सरकारने यावर तात्काळ निर्णय घेणे गरजेचे आहे.

विधान परिषदआमदार योगेश टिळेकर म्हणाले की, महानगरपालिकेवरील वाढता ताण आणि पूर्व पुण्यातील उपनगरांच्या समस्या सोडवण्यासाठी, मी आज हडपसर-मांजरी-वाघोलीसाठी स्वतंत्र महानगरपालिकेच्या निर्मितीची मागणी केली आहे. या भागाची लोकसंख्या आणि आर्थिक क्षमता पाहता, हा निर्णय न्यायसंगत आणि आवश्यक आहे. यावर सरकारने तातडीने विचार करावा अशी मागणी केली. परंतु, सध्या नव्या महानगरपालिकेचा कोणताही प्रस्तावित निर्णय नसल्याने नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांना लागेल तेवढा निधी देण्याचा मंत्री महोदयांनी आश्वासन दिले आहे.

# जमीन ताब्यात घेण्याचा प्रकार पोलिसांनी पाडला हाणून

**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत मगर वस्तीवर जमीन ताब्यात घेण्यासाठी आलेल्या नागरिकांना योग्य ती कायदेशीर समज देऊन पोलिसांनी ताब्याचा प्रकार हाणून पाडला आहे.

मगर वस्तीवरील जागेत न्यायालयीन दावे दाखल असून यापूर्वी देखील जमीन ताब्यात घेण्याचे प्रकार घडले होते. बाहेरच्या व्यक्तींच्या मदतीने जमीन ताब्यात घेण्यासाठी आलेले व्यक्तींची माहिती शेतकऱ्यांनी पोलिसांना कळवून तातडीने पोलिसांचे पथक दाखल होऊन जमीन ताब्यात घेण्याचा प्रकार पोलिसांनी हाणून पाडला आहे.



कुख्यात गुंड टिपू पठाण इतर गुंडांचा वापर ही जमीन ताब्यात घेण्यासाठी यापूर्वी झाल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल आहेत. तरीदेखील येरवडा जेलच्या एका माजी जेलरच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकार चालू असल्याचा आरोप करत तक्रार लोणीकंद पोलीस ठाण्यात संबंधित शेतकऱ्यांनी दाखल केली आहे. सध्या सोशल मीडियावर या ताब्याच्या प्रकाराचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

> **मगर वस्तीवरील जमिनीच्या ताब्याबाबत शेतकऱ्यांची तक्रार आल्यानंतर तातडीने पथक पाठवून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. यापुढील काळात असे प्रकार घडले तर कडक कायदेशीर कारवाई करणार आहे.**
>
> **– सर्जेराव कुंभार , वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणीकंद**

शेत जमिनीचे प्रकरण एकीकडे मिटवण्याचे नाटक करून दुसरीकडे ताबा घेण्यासाठी येरवड्याच्या माजी जेलर प्रयत्न करत असल्याचे रेकॉर्डिंग देखील पोलिसांकडे शेतकऱ्यांनी दिले आहे.

ताबा घेण्यासाठी आलेल्या नागरिकांची चारित्र्य पडताळणी करून बेकायदेशीरपणे शिरकाव करून शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सुनील सोनवणे, अक्षय सोनवणे, संजय मगर, स्वप्निल मगर या शेतकऱ्यांनी लेखी निवेदनाद्वारे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांकडे केली आहे.




# चंदनापुरी घाटात विद्यार्थी घेऊन येणाऱ्या स्कूल बसचा अपघात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चंदनापुरी घाटात चंदनेश्वर विद्यालयाचे विद्यार्थी घेऊन येणाऱ्या स्कूल बसचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात बसमधील विद्यार्थी जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. साकूर गावातून विद्यार्थी घेऊन ही स्कूल बस येत असताना ही अपघाताची घटना घडली असल्याची माहिती आहे.









# महाराष्ट्र राज्याला साथीच्या आजाराचा विळखा

दरवर्षी जून ते सप्टेंबर महिन्यात पाऊस पडतोच, फरक इतकाच आहे की कोणत्या वर्षी तो कमी पडतो, तर कोणत्या वर्षी तो जास्त पडतो. पण पावसाळा कालावधीत एकच साम्य आहे आणि ते म्हणजे पाऊस पडायला लागल्यावर काही दिवसांतच राज्याच्या शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांमध्ये साथीच्या आजारांचा उद्रेक होत असतो. या कालावधीत खासगी दवाखाने, रुग्णालये, शासकीय नागरी आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांची वाढती गर्दी पाहून आजारांचा उद्रेक किती वाढला आहे, याची प्रचिती येते. ताप, हिवताप, मलेरिया, डेंग्यू, चिकगुणिया, स्वाईन फ्ल्यू या साथीच्या आजारांच्या रुग्णांचा वाढता आलेख याच कालावधीत असतो. खासगी दवाखाने, रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची यादी व संख्या शासकीय यंत्रणेकडे पुरेशी जात नसल्याने खरी आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यात सध्या खोकला, कफ, घसादु:खी यांसह कोरोनाचे रुग्ण सापडू लागल्याने देशाच्या आर्थिक राजधानीला आजारांचा विळखा बसल्याचे पाहावयास मिळत आहे.

सर्दीपासून सुरू झालेला आजार तापापासून मलेरिया-कोरोनापर्यंत पोहोचण्यास फारसा वेळ लागत नसल्याने मुंबईत साथीच्या आजारांच्या वाढत्या आलेखाचे गांभीर्य वेळीच ओळखणे आवश्यक आहे. पावसाळ्यात साथीच्या आजारांचा दरवर्षी उद्रेक होतो, हे गृहीत धरून मुंबईसह सभोवतालच्या महापालिका, नगरपालिका, ग्रामीण भागातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करत असतात. शहरी भागात मलेरिया व डेंग्यूचा आजार हा डासांमुळेच होत असल्याने डास नियंत्रणासाठी धुरीकरणावर विशेष भर देण्यात येतो. पूर्वीच्या काळी साथीच्या आजारांचा उद्रेक हा प्राधान्याने शहरी भागातच होतो.

ग्रामीण भागामध्ये त्याचे प्रमाण नगण्य असायचे. पण अलीकडच्या काळात साथीच्या आजारांनी ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर शिरकाव केल्याने शहरी व ग्रामीण असा कोणताही भेदभाव आता शिल्लक राहिला नाही. डासांपाठोपाठ पावसाळ्यात तलावातून शहरी व ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांतून दूषित पाणी येत



असल्यानेही साथीच्या आजाराला पोषक वातावरण उपलब्ध होते. तलावक्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे चिखल व गाळाचे पाणीही जलवाहिन्यांतून आपल्या घरामध्ये येते. यामुळे कधी पिवळसर, कधी तांबूस, कधी लालसर रंगाचे पाणी दिसून येते. त्यातच कोठे जलवाहिन्या फुटल्यास तेथील माती, चिखलाचाही समावेश त्यात होत असतो. दूषित पाण्याची समस्या अलीकडच्या काळात वाढीस लागल्याने साथीच्या आजारांचा उद्रेक होऊ लागला आहे. राज्याला साथीच्या आजाराचा विळखा पडत असून, गेल्या साडेपाच महिन्यांत मलेरियाचे ४४७१ रुग्ण तर डेंग्यूचे रुग्ण २०३१ आढळले आहेत. तर चिकनगुनियाचे ९०० रुग्ण आढळले. शहरी भागातील मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनियाचे सर्वाधिक रुग्ण मुंबई महापालिका क्षेत्रात आहेत. मुंबईसोबत ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल-उरण, भाईंदर परिसरातही साथीच्या आजारांचा उद्रेक सध्या झाला आहे. ज्या ठिकाणी खाडी किनारा आहे, तेथे डासांच्या उद्रेकास पोषक वातावरण मिळाल्याने साथीच्या आजारांना पोषक वातावरण तयार होत असते. गलिच्छपणा, साचलेले पाणी, तुंबलेली गटारे-नाले या ठिकाणीही डासांचा फैलाव झालेला असतो. साथीच्या आजारांमध्ये अन्य आजारांच्या तुलनेत मलेरियाचे प्रमाण अधिक असते.

यंदा राज्यात मान्सून महिनाभर आधी दाखल झाल्याने साथीच्या रुग्णांमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. राज्यातील जिल्ह्यामध्ये गडचिरोलीमध्ये ११८०, रायगडमध्ये २११, गोंदियात २८ रुग्ण आढळले आहेत. महापालिकांचा विचार करता मुंबई २३१४, पनवेलमध्ये २१६, ठाण्यात १२८ रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूचे पालघरमध्ये १३३, पुणे १२८, अकोला ११९, सिंधुदुर्ग ६६ रुग्ण आढळले. महापालिकांमध्ये मुंबईनंतर नाशिक ३९५, अकोला १३९ , नाशिक १३२, ठाणे ६३ रुग्ण आढळले. राज्यामध्ये मलेरियाचे रुग्ण सामान्यत: पावसाळ्याच्या म्हणजेच जुलै ते ऑक्टोबर तसेच डेंग्यूचे रुग्ण सामान्यत: ऑगस्ट ते नोव्हेंबर या महिन्यांत वाढतात. मुख्य कारण म्हणजे तापमान, आर्द्रता आणि अधूनमधून पडणारा पाऊस यांसारख्या हवामानाच्या परिस्थितीमुळे डासांची पैदास होत असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले होते, मात्र यंदा जानेवारीपासून रुग्ण आढळत आहेत. राज्यात चिकनगुनियाच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याने महाराष्ट्राच्या आरोग्य विभागावर कमालीचा ताण पडला आहे. राज्यात ९०० चिकनगुनियाचे रुग्ण आढळले. पण गेल्या वर्षीच्या तुलनेत रुग्णसंख्या वाढल्याचे दिसून येत आहे. पुणे १०४, अकोला ८५, पालघर ६९, सिंधुदुर्ग ४४, महापालिकानिहाय मुंबई ११९, अकोला १०१, सांगली मिरज २४ रुग्ण आढळून आले आहेत. राज्यात लेप्टोचे एकूण १२१ रुग्ण आढळले आहेत, तर स्क्रब टायफसचे १८ आणि जपानी तापाचे ३ रुग्ण आढळले आहेत. स्वाइन फ्लूचे एकूण २०४ रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला आहे. मुंबईत सर्वाधिक ४२ रुग्ण आढळले आहेत. त्यानंतर सोलापूरमध्ये ३६, पुण्यात ३१, नागपूरमध्ये २७, ठाण्यात २१, छत्रपती संभाजीनगरमध्ये १९, कोल्हापूरमध्ये १७ रुग्ण आढळले आहेत. राज्यात गेल्या १३५ दिवसांत १००४ रुग्ण आढळले आहेत, ज्यात कॉलराचे २२, गॅस्ट्रोचे ३२, अतिसाराचे ४१४, सांध्याचे ५१३ आणि टायफॉइडचे २२ रुग्ण समाविष्ट आहेत. राज्यात आतापर्यंत बर्ड फ्लूचे ७३ रुग्ण आढळले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत मुंबईमध्ये साथीच्या आजारांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी जून महिन्यात आढळलेल्या रुग्णसंख्येच्या तुलनेत यंदा जूनच्या पंधरा दिवसांतील रुग्ण अधिक असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच राज्याला डेंग्यूच्या आजाराने विळखा घातला आहे. शहरासह ग्रामीण भागात डेंग्यूचे रुग्ण आढळत असल्याने राज्याच्या आरोग्य विभागाची झोपच उडाली आहे. डेंग्यूचा डंख वाढल्याने पालिका प्रशासनही सतर्क झाले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीची ही रुग्णसंख्या चिंताजनक असल्याचे राजाची आरोग्य यंत्रणा कामाला लागली आहे. डेंग्यू हा सर्वांत मोठ्या प्रमाणावर डासांमुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे.

## नाना काटे यांच्या दूरदृष्टीतून पिंपळे सौदागरमध्ये उभारणार जगातील सात आश्चर्य

### पिंपरी चिंचवड शहराला हेवा वाटावा असे साकारतेय महाराष्ट्रातील एकमेव "वेस्ट टु वंडर वर्ल्ड थीम पार्क"


**पिंपरी चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपळे सौदागर मधील राजमाता जिजाऊ उद्यान येथे महापालिकेच्या वतीने महाराष्ट्रातील एकमेव "वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क" साकरण्यात येत आहे .

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नाना काटे यांच्या यांच्या दूरदृष्टीतून हे काम सुरू आहे.

जगातील ७ आश्चर्य असणाऱ्या वास्तु व इतर ऐतिहासिक वास्तु या स्मारकाच्या स्वरूपात येथे साकरण्यात येत आहे. टाकवू पासून टिकाऊ धोरण वापरुन हे थीम पार्क साकरण्यात येत आहे.या थीम पार्क मध्ये एकूण १७ ऐतिहासिक वास्तु असणार आहेत.





ज्यामध्ये जगातील ७ आश्चर्य असणारे ताज महल, आयफेल टॉवर, बुर्ज खलिफा, लीनिंग टॉवर ऑफ पिसा, सिडनी ऑपेरा हाऊस, अजंता कव्ह, ला सागराडा फॅमिलीया, चिचेन इतजा, पीरामीड ऑफ गिझा, पेट्रा ऑफ जोर्डन, कोलोसियम ऑफ रोम, बिग बेन ऑफ लंडन, अकोर वट ऑफ कंबोडिया, हंपी चारियट, स्टॅच्यू ऑफ लिबरटी, ट्रेव्ही फाउंटन, माऊंट रश्मोर. इत्यादी वस्तु साकरण्यात येणार आहे.

या संपूर्ण थीम पार्क साठी एकूण ११.०२ कोटी रुपये इतका खर्च करण्यात येणार असून पिंपळे सौदागर येथे साकारण्यात येणारे हे थीम पार्क महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली होत आहे.

हे वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क महाराष्ट्रातील एकमेव पार्क असून यामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या वैभवात भर पडणार आहे.तसेच हे वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क पूर्ण झाल्यास नक्कीच महाराष्ट्रातील पर्यटन स्थळ होईल यात काही शंका नाही. हे थीम पार्क लवकरच पूर्ण होवून नागरिकांसाठी खुले होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी नगरसेवक नाना काटे यांनी संपूर्ण कामाची तसेच जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. हे पार्क लवकरात लवकर नागरिकांसाठी कसे खुले करता येईल यासाठी प्रयत्न करणार आहे. असे काटे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## धायरीत शनिवारी भव्य जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथे पाच जुलै शनिवार रोजी भक्तगणासाठी इस्कॉन व अखिल धायरी ग्रामस्थ यांच्या वतीने जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पाच जुलै रोजी ही रथयात्रा संपन्न होणार आहे.

धायरी व परिसरामध्ये अनेक श्रीकृष्ण भक्त यांचा अधिवास आहे. त्यांच्यासाठी ही एक पर्वणी ठरणार आहे.

जगन्नाथ रथयात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या भक्त भक्तगणाला आशीर्वाद मिळतो अशी आख्यायिका आहे. रथयात्रेत सहभागी होऊन रथ ओढण्याची संधी मिळणे हे देवाचे आशीर्वाद मानले जातात. असे मानले जाते की यामुळे जीवनातील सर्व पापांचा नाश होतो आणि मोक्ष मिळतो. म्हणून जगन्नाथाचा रथ ओढण्यासाठी भाविकांची चढाओढ सुरु असते.




भक्त या जगन्नाथ रथयात्रेमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात. या जगनाथ रथयात्रेसाठी माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. जगन्नाथ रथ यात्रेचे हे चौथे वर्ष आहे..

इस्कॉन व अखिल धायरी ग्रामस्थ स्वामी जगन्नाथ रथयात्रा महोत्सव यांच्या वतीने दुपारी तीन ते रात्री आठ वाजता रायकर नगर ते धारेश्वर मंदिर अशी भव्य दिव्य जगन्नाथ रथयात्रा निघणार आहे.

श्रीमान महावीर्य प्रभुजी यांचे प्रवचन होणार आहे. याशिवाय प्रबोधनात्मक किर्तन प्रवचन व जगन्नाथ रथ दर्शन असे उपक्रम राबविण्यात आले आहेत. याशिवाय रात्री आठ नंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे.

जगनाथ रथयात्रेच्या सोहळ्याच्या निमित्त धायरी मध्ये विविध कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रबोधनात्मक प्रवचन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असं आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



## युवा शेतकरी संघ महाराष्ट्र राज्य संघटनेतर्फे शालेय साहित्य भेट

**धनकवडी (दै. आरंभ पर्व)**

युवा शेतकरी संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. संस्थापक अध्यक्ष रोहिदास (बापू)चोरगे यांच्या नेतृत्वाखाली अक्षर स्पर्श मतिमंद विद्यालय जांभूळवाडी येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष रोहिदास बापू चोरगे, अक्षरस्पर्श संस्थेचे अध्यक्ष सौ .दिपाली निखळ, सामाजिक कार्यकर्ते दीपक चौघुले ,सोपान भाऊ चोरगे ,शरद पिलाने सागर मोझर, राकेश खोपडे ,शोभराज चोरगे, संतोष खुटवड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना रोहिदास बापू चोरगे यांनी आगामी काळामध्ये हजारो विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा मनोदय बोलून दाखवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक चौघुले यांनी केले तर आभार संस्थेच्या अध्यक्षा दिपाली निखळ यांनी मानले.

## धायरीतील श्री ज्वेलर्सचा करोडो रुपयांचा घोटाळा

- **सुवर्णभिशी योजना ग्राहकांच्या मुळावर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील प्रसिद्ध श्री ज्वेलर्स गेल्या आठवड्या मधून चर्चेत आले आहे. महिलांसाठी सुवर्ण भिशी नावाची योजना आणून महिला व ग्राहकांची मोठी फसवणूक यामधून झाली आहे.

**'दैनिक आरंभ पर्व'ने** ग्राउंड स्तरावर जाऊन घेतलेला ग्राउंड रिपोर्ट. धायरी भागामध्ये मध्यमवर्गीय व कष्टकरी कुटुंब यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांना सोनेतारण, थोडेफार पैसे गुंतवणूक करून सोने घेण्याचा प्रयत्न असतो.

धायरीतील प्रसिद्ध असलेल्या श्री ज्वेलर्स चा मालक विष्णू दहिवळ, त्याचा भाऊ ज्ञानेश्वर दहिवळ, त्याची पत्नी स्वाती दहिवळ यांनी या भागातील महिला व नागरिकांना सुवर्ण भिशी नावाची एक स्कीम आणली.

त्यामध्ये बारा महिने चे पैसे भरल्यानंतर तेरावा महिना त्यांच्याकडून भरून त्या पैशाचे सोने






### प्रतिक गंगणे, व्यवस्थापकीय संपादक

त्यांना देण्यात येते. सुरुवातीस सर्वांशी योग्य व्यवहार व संपर्क त्यांनी ठेवला. त्यामुळे या भागामध्ये श्री ज्वेलर्सची सुवर्ण भिशी योजना चांगलीच गाजली. भागातील अनेक महिलांनी या ज्वेलर्स कडे सुवर्णभिशी योजना व सोनेतारण ठेवण्यास सुरुवात केली.

ग्राहकांचा प्रतिसाद पाहता दहिवळ कुटुंब कोणत्यातरी कारणामुळे आर्थिक अडचणीला सामोरे गेले की जाणीवपूर्वक फसवणूक करण्याच्या हिशोबाने त्यांनी दुकानावर खोट्या चोरीचा बनाव रचला. आणि त्यानंतर पोलीस चौकशीमध्ये हा केवळ फिल्मिस्टंट होता हे सिद्ध झाले. त्यानंतरपासून दहिवळ कुटुंबीयांनी ग्राहकांशी संपर्क तोडायला सुरुवात केली.

सुरुवातीस दोन तास उघडे ठेवणारे दुकान मागील महिन्यापासून बंद आहे. या तिघांनीही त्यांचे मोबाईल नंबर बंद केले. साहजिकच योजनेमध्ये पैसे गुंतवणाऱ्या महिला व ग्राहकांची मोठी फसवणूक झाल्याचे सिद्ध झाले.

जवळपास अडीच कोटी रुपयांचा हा स्कॅम असल्याची चर्चा चालू आहे. कुणाचे 22 लाख कोणाचे दहा तोळे सोने कुणाचे दहा हजार त लहानापासून मोठ्या रकमा पर्यंत अनेकांचे पैसे व सोने दहिवळ परिवाराने लुबाडल्याचे यानिमित्त सिद्ध होत आहे.

यामुळे याची संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा सुरू आहे. कष्ट करून जगणाऱ्या महिलांना हा एक मानसिक धक्का बसल्याचे दिसून येते.

आरंभ पर्वशी बोलताना अनेक महिलांना गहिवरून आले. साहेब काही करा त्या सराफाला पकडा मात्र आमचे पैसे दागिने परत करा ही शासनाकडे विनंती आहे अशी मागणी यानिमित्त महिलांनी केली ..

वास्तविक ह्यासाठी गेल्या अनेक दिवसापासून पोलीस यंत्रणाकडे यातील नागरिक गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न करत होते.

मात्र थोडीशी दिरंगाई झाल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दहिवळ कुटुंबाचे नातेवाईकांचे सीडीआर काढून त्यांचा तपास सुरू असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसे यांनी सांगितले.

सुवर्णपभीशी योजनेसाठी काही नियमावली असावी यासाठी ही प्रयत्न असल्याचे भोसे यांनी यानिमित्त सांगितले.

गेल्या तीन महिन्यापासून भागातील सामाजिक कार्यकर्ते किशोर पोकळे हे महिला व या ज्वेलर्सच्या ग्राहकांसाठी झटत आहेत. गुन्हा दाखल होण्यापासून विधानसभेत लक्षवेधी मांडण्यापर्यंत किशोर पोकळे यांनी चांगला प्रयत्न केला आहे. नुकतीच विधानसभेत आमदार भीमराव तापकीर यांनी हा विषय मांडला त्यानंतर गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी चौकशी आदेश दिले आहेत.

सदर आरोपींना तात्काळ अटक करावी व ग्राहकांचे पैसे व सोने त्यांना परत मिळावे. अन्यथा आंदोलनाचा इशारा किशोर पोकळे यांनी दिला आहे.

याबाबत **'दैनिक आरंभ पर्व'**चे व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना नागरिकांनी व महिलांनी जागरूकपणे सोन्याची खरेदी व गुंतवणूक करण्यात यावी.

अन्यथा त्याचा मोठा फटका परिवाराला बसतो. शासनाने या ग्राहकांना न्याय द्यावा हीच विनंती केली.

## थोडक्यात



### निवेदक राज शिनारे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

धायरी (आरंभ पर्व) : नऱ्हे,धायरी व पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध निवेदक, शिवव्याख्याते. मा.राज शिनारे यांचा वाढदिवस सूर्योदय वृद्धाश्रम धायरी या ठिकाणी आबाल वृद्धांना फळे व खाऊ वाटप करून संपन्न झाला. वाढदिवसाच्या दरवर्षीच्या अवाढव्य खर्चाला फाटा देत समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करत आपण या समाजाचा काहीतरी देणे लागतो या भावनेतून शिवव्याख्याते राज शिनारे यांनी सामाजिक उपक्रम राबवला. समाजामध्ये असाही घटक आहे की यांच्या आयुष्यामध्ये कोणच नाही असले तरी त्यांचा सांभाळ करत नाही. अशा व्यक्तींचा सांभाळ तेजस्विनी फाउंडेशन सर्वोदय वृद्धाश्रम यांच्या मार्फत होत आहे. त्यांच्या समाज कार्यात खारीचा वाटा म्हणून हा वाढदिवस या थोरामोठ्यांच्या आशीर्वादाने संपन्न करण्यात आला. निवेदक राज सिनारे यांना वकृत्व व सामाजिक क्षेत्रातील दीपस्तंभ पुरस्कार मिळालेला आहे. समाजाविषयी तळमळ असलेल्या या सामाजिक कार्यकर्त्यास सर्व स्तरावर वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी, विश्व मराठा संघटनेचे सन्मा. शिवराज दादा पाटील, अभिषेक सूर्यवंशी, उद्योजक राहुल कामठे, चेअरमन सुनील वराळ प्रा.सुनील सिनारे आणि कुटुंबीय उपस्थित होते.



### जाधवराव परिवाराकडून वृक्ष भेट

पुणे (आरंभ पर्व) : आपल्याकडे किती आहे त्यापेक्षा आपण ज्या समाजाचे घटक आहोत त्या समाजाला किती देतो याला जास्त महत्त्व आहे. घासातला घास देणारे आणि जिथे गरज आहे तिथे कोणताही गाजावाजा न करता मदत करणारी माणसं आता खूप कमी आहेत व अशी माणसं कायम लक्षात रहातात. अशीच आपल्या पूर्वजांची आठवण म्हणून व पर्यावरण संवर्धनासाठी वैविध्यपूर्ण वृक्षदान जाधवराव परिवारातर्फे नारायण नवले शाळेला देण्यात आले. बाजीराव पेशवे आणि चिमाजी आप्पा यांचे युद्ध शास्त्रातील गुरू म्हणून ओळखले जाणारे आणि मराठा साम्राज्याच्या विस्तारात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणारे, आपल्या पराक्रमाने परकीयांना धडकी भरवणारे श्रीमंत सरदार पिलाजीराव जाधवराव यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे नांदेड गावचे वंशज, शेतकरी, उद्योजक व विविध माध्यमांतून सामाजिक ऋण फेडणारे आदरणीय समीरदादा जाधवराव व त्यांच्या कुटुंबियांनी कै. नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय मनपा शाळा क्रमांक २०४ बी ला झाडे भेट दिली. समीर जाधवराव व त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण देणगी बद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर यांनी जाधवराव कुटुंबियायांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास रवी पवार यांच्यासह शाळेतील मुख्याध्यापक सौ. सविता मानकर उपशिक्षक - भारती देशमुख, वैशाली रणधीर, कविता दराडे, प्रमिला तनपुरे, संजय हरपुडे, क्षितिजा साठे, शर्मिला करंजावणे, श्रद्धा नाडकर्णी सर्व शिक्षक, बालवाडी शिक्षिका व सेवक उपस्थित होते.



### कै. सौ. पायल निचळ यांच्या स्मरणार्थ कीर्तन सेवा संपन्न

बार्शी (आरंभ पर्व) : सारोळे येथील सामाजिक कार्यकर्ते बालाजीभाऊ निचळ यांच्या पत्नी स्व.सौ. पायल निचळ यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ स्मरणार्थ प्रबोधनात्मक किर्तन आयोजित करण्यात आले. ह. भ. प अश्विनीताई राऊत यांनी कीर्तनातून जनजागृती केली. यावेळी श्रोत्यांनी चांगला प्रतिसाद दिला. यावेळी विविध मान्यवर व नागरिक , महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सौ.पायल निचळ यांच्या आठवणीही निम्मित ह भ प. अश्विनीताई राऊत यांनी यावेळी सांगितल्या.

## थोडक्यात



### माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

पुणे (आरंभ पर्व) : माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त संत सेवालाल महाराज बंजारा कल्याण समितीच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्याचप्रमाणे लाडू वाटप करून आनंद साजरा करण्यात आला. यावेळी रमेश चव्हाण यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी सुनील राठोड, रविराज राठोड, स्वप्नील चव्हाण, राहुल चव्हाण, निशिकांत चव्हाण, तुषार चव्हाण, गोविंद चव्हाण, अक्षय चव्हाण, भारत पवार, विघ्नेश राठोड, देवन चव्हाण व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



### वाघोलीतील मतदारांचे मताधिकार हिरावले जात आहेत?

- वाको वेल्फेअर असोसिएशनचा शिरूर निवडणूक विभागावर गंभीर आरोप

पुणे (आरंभ पर्व) : निवडणुकीत जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे, म्हणून सरकारकडून सातत्याने जनजागृती मोहीम राबवली जाते. परंतु याच्या उलट, वाघोलीतील शेकडो नागरिकांचे मतदार ओळखपत्र अर्ज सातत्याने व योजनाबद्ध पद्धतीने शिरूर निवडणूक विभागाकडून नाकारले जात आहेत. हा लोकशाही व्यवस्थेवर घातक आघात असून, नागरिकांना मतदानापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न आहे, असा गंभीर आरोप वाको वेल्फेअर असोसिएशनने पत्रकार परिषदेत केला आहे. यावेळी अध्यक्ष अनिल कुमार मिश्रा यांनी सांगितले की, गेल्या ४–५ महिन्यांपासून वाघोलीतील नागरिकांनी फॉर्म ६ (नवीन नोंदणी) व फॉर्म ८ (सुधारणे/पत्ता बदल) अर्ज सादर केले. परंतु ठोस कारण न देता हे अर्ज शिरूर तहसील कार्यालयात प्रत्यक्ष हजेरीसाठी पाठवले जात आहेत. हे कार्यालय वाघोलीपासून सुमारे ५० किमी अंतरावर असल्याने, अनेक नागरिक, विशेषतः वयोवृद्ध, महिला व नोकरदार वर्ग, प्रत्यक्ष हजेरी लावू शकत नाहीत. परिणामी, मोठ्या प्रमाणात अर्ज फेटाळले जात आहेत. वाघोलीत मागील १५ वर्षांपासून स्थानिकांनी शासनाचे सर्व प्रकारचे कर, शुल्क आणि सेस वेळेवर भरले असूनही मूलभूत नागरी सुविधा अत्यंत अपुऱ्या आहेत. येथे अनेक नागरिक महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यांतील वेगवेगळ्या भागांतून स्थलांतरित होऊन स्थायिक झाले आहेत.

### वडाळा गावचे तीर्थक्षेत्र 'श्रीप्रतिपंढरपूर'

ठाणे (आरंभ पर्व) : आषाढी एकादशी म्हणजे पंढरीचा मानाचा दिवस. आपल्या या विठुरायाचे दर्शन घेण्याच्या लगबगीने सारे वारकरी वारी करीत पंढरीची पायी वाटचाल करीत असतात. टाळ मृदुंग, ग्यानबा-तुकाराम, जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठल या जयघोषात या विठुरायाचे नामस्मरण करीत वारकरी विठ्ठलाच्या नामस्मरणात लीन होताना दिसतात. प्रत्येक विठ्ठलभक्ताला आपल्या देवाचे दर्शन व्हावे असे वाटत असते. परंतु प्रत्येकालाच वारीला जाण्याची संधी मिळेलच असे नाही. असंच मुंबईकरांच्या बाबतीत काही दिसून येते. मुंबई मधील भक्तांना या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही. अशावेळी हे भक्त मुंबईतील वसलेल्या वडाळा गावांत "प्रतिपंढरपूर" या मंदिरात वारी काढतात. मुंबईतील पंढरीत टाळ मृदुंगाचा नाद, वैष्णवांचा मेळा, भगवा पताका, विद्युत रोषणाई हे सारे दृश्य पाहायला मिळते. अशाच मुंबईतील प्रसिद्ध प्रतिपंढरपूर" म्हणजेच वडाळा गांवातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर.

# मोरे यांच्या चक्काजाम नंतर नऱ्हे बदलताना दिसतंय

**नागरिक व वरिष्ठाकडून मोरे यांच्या कामाचे कौतुक : ड्रेनेज, रस्त्यावरील खड्डे व पाण्याचा प्रश्नही मार्गी लागल्याची परिसरातील नागरिकांची भावना**

- नऱ्हेकरांच्या मागण्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास मुंबई बेंगलोर हायवे रोखण्याचा भूपेंद्र मोरेंचा इशारा





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकत समाविष्ट गावातील महत्त्वाच गाव असणाऱ्या नऱ्हे परिसरातील विविध समस्या सातत्याने मांडणाऱ्या सामजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे.

जनतेच्या प्रश्नासाठी जीवाची बाजी लावून जनतेचे प्रश्न सोडवणारा नेता ही त्यांची ओळख आहे. यापूर्वी त्यांनी आमरण उपोषण, रास्ता रोको, विविध मोर्चे अशी विविध मोठी आंदोलने केली आहेत.

मागील आठवड्यामध्ये त्यांनी कृष्णाई नगर परिसरात चक्काजाम आंदोलन केले होते. तब्बल पाच तास चाललेल्या या चक्काजाम मुळे नऱ्हे धायरी फाटा वाहतूक ठप्प झाली होती.

त्यांच्या आंदोलनासाठी प्रसंगी प्रशासनालाही सुट्टीच्या दिवशी आंदोलन स्थळी येऊन आंदोलनाची दखल घ्यावी लागली.

त्यावेळी भूपेंद्र मोरे यांनी सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार व प्रशासनाकडे रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज, अर्धवट रस्ते खड्डे, अपुरा पाणीपुरवठा, अस्ताव्यस्त कचरा यावर तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी केली. आणि आंदोलनाच्या त्याच दिवशी रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज बंद करून अर्धवट रस्ते काम हाती घेण्यात आले. त्यानंतर बांधकाम विभागाकडून रस्त्यावरील खड्डे ही बूजविण्यात आले .

या भागातील पाणी प्रश्नावरती त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली होती. मोरे यांच्या चक्काजाम चक्काजाम आंदोलनानंतर त्यांची परिसरात सर्वत्र चर्चा झाली. याची सर्व माध्यमांनी ही दखल घेतली .त्यांच्या आंदोलनाने नऱ्हे परिसरातील परिस्थिती बदलत असल्याचे दिसून येत आहे.

अनेक नागरिकांनी मोरे यांच्या कामा विषयी कौतुक व्यक्त करत असा व्यक्ती लोकप्रतिनिधी व्हायला हवा अशी प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसत आहेत.

भूपेंद्र मोरे यांच्या कार्यपद्धतीबद्दल राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, प्रदेश प्रवक्ते राहुल पोकळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वरिष्ठानीही कौतुकाची थाप त्यांना दिली आहे.

रस्त्यावर झटणारा हा नेता आगामी पुणे महानगरपालिकेमध्ये जायला हवा अशी इच्छाही यानिमित्त नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नऱ्हे परिसरातील राही सोसायटीमध्ये पाणी समस्यांनी नागरिक हैराण झाले होते. त्यावेळी मोरे यांनी स्वतः हजर होत पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याची माहिती दिली. संबंधित पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना जाब विचारत लगेच तोडगा काढण्यात आला. आणि तेथील पाणीपुरवठा सुरळीत झाला. त्यामुळे नेता असावा तर असा म्हणत नागरिकांनी मोरे यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

आगामी काळातही जनसेवेत बांधील राहून ह्या भागातील नागरिकांचे विविध प्रश्न मांडण्यासाठी नक्कीच पाठ पुरावा करणार आहे. प्रशासनाने आमच्या मागण्याकडे दुर्लक्ष केल्यास आठवड्यानंतर मुंबई बेंगलोर हायवेवर रास्ता रोको करण्याचा त्यांनी दिला आहे. असे मोरे यांनी सांगितले.

## गायब ट्रान्सफॉर्मर अखेर सापडला

**मात्र महावितरण व पोलीसांच्या भुमिकेवर प्रश्नचिन्ह**

**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

वाघोली येथील वर्ल्ड ऑफ जॉय गेरा प्रोजेक्टमध्ये २०१९ साली बसवलेला २०० केव्हीए क्षमतेचा महावितरणचा ट्रान्सफॉर्मर २०२० पासून निष्क्रिय होता. एप्रिल २०२५ मध्ये गतीशक्ती ॲपच्या माध्यमातून मॅपिंग करत असताना ट्रान्सफॉर्मर गायब असल्याचे निदर्शनास आले. यानंतर महावितरणचे सहाय्यक अभियंता दीपक बाबर यांनी वाघोली पोलीस ठाण्यात ९ मे २०२५ रोजी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी गु.र.नं. १८१/२०२५ अंतर्गत भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३६, १३८ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला.

या गुन्ह्यातील गायब ट्रान्सफॉर्मर ९ जून २०२५ रोजी प्लॅनेट ऑफ जॉय (गट नं. १२८६) येथे मोकळ्या जागेत बेवारस अवस्थेत आढळून आला. पोलीस व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा करून ट्रान्सफॉर्मर ताब्यात घेतला. ट्रान्सफॉर्मरची अंदाजे किंमत ३.८० लाख रुपये असून, त्याचा माल क्रमांक ०५३३३५२ आहे. हा ट्रान्सफॉर्मर सिल्व्हर लाईन कंपनीचा असून, सर्व भाग व्यवस्थित स्थितीत आहेत. असे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे

विशेष म्हणजे, सहाय्यक अभियंता दीपक बाबर यांनी ट्रान्सफॉर्मर पुन्हा ताब्यात घेताना "माझी काही हरकत नाही" असा लेखी उल्लेख केला आहे. त्यामुळे ट्रान्सफॉर्मर अचानक कसा सापडला, मोकळ्या जागेत इतक्या दिवसांपासून होता तरी यापूर्वी कुणाच्या निदर्शनास का आला नाही, तो एकदम चांगल्या स्थितीत आहे, आणि तो कुणी हलवला या सर्व बाबींबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

यापप्रकरणात आरोपी अद्याप अज्ञात आहेत. ट्रान्सफॉर्मरसारखी महत्त्वाची वीज उपकरणे स्थानांतरित करण्यासाठी संबंधित शाखेची परवानगी आवश्यक असते. त्यामुळे कोणतीही अधिकृत नोंद नसताना ट्रान्सफॉर्मर गायब होणे आणि नंतर सापडणे यावर महावितरणच्या कार्यपद्धतीबाबत शंका उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करून संबंधित जबाबदार व्यक्तींची नावे समोर येणे अपेक्षित आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> **सर्वसामान्य व्यक्तीने एखादा गुन्हा केला तर त्याला पोलीस देखील तात्काळ आरोपी करतात , परंतु एवढा गंभीर गुन्हा असताना देखील या गुन्ह्यात अजून आरोपी अज्ञात असल्याने पोलिसांच्या कामगिरीवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**

## अध्यक्षपदी डॉ. सांगोलेकर, स्वागताध्यक्षपदी डॉ. भोसले यांची निवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्वबंधुता साहित्य परिषद आणि रयत शिक्षण संस्थेचे पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालय यांच्या वतीने पुढील महिन्यात पिंपरी येथे होणाऱ्या बाराव्या विश्वबंधुता विद्यार्थी आणि शिक्षक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, गझलकार व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी मराठी विभागप्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर यांची, तर स्वागताध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या साहित्याचे अभ्यासक डॉ. पांडुरंग भोसले यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली. डॉ. सांगोलेकर यांच्या स्वलिखित १५ आणि संपादित १२ अशा २७ साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. त्यातील 'मराठी गझल: १९२० ते १९८५', 'दलित साहित्यः प्रवाह आणि प्रकार' या विशेष लोकप्रिय झाल्या आहेत. डॉ. भोसले हे गेल्या ३५ वर्षांपासून रयत सेवक म्हणून कार्यरत आहेत. २६ पुस्तकाचे त्यांनी संपादन केले आहे. तसेच त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रात सहभागी होऊन ४३ शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या काव्य व लेखणीला विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



## दावडीत बालवारकऱ्यांनी काढली दिंडी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

दावडी (ता. खेड ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल- रूक्मिनी, संत तुकाराम व वारकऱ्यांची वेषभूषा केली होती. दिंडीतून 'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश देण्यात आला. टाळ मृदुंगाच्या गजरात व 'ग्यानबा-तुकाराम' च्या घोषात गावातून दिंडी प्रदक्षिणा करण्यात आली.

वारकरी सांप्रदायाच्या परंपरेला जोपासून टाळ-मृदंगाचा गजर करून सकाळी दिंडीला सुरुवात झाली. मुख्याध्यापीका श्रीमती कुंदा वळसे यांनी ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेचे व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन करून दिंडीचा शुभारंभ केला. परिसरातील भाविकांनी दिंडीच्या माध्यमाने विठ्ठल- रूखमाईचं दर्शन घेतले. गावातील महिलांनी दिंडीतील पालखीची पुजा केली. तसेच गवळण म्हणण्यात व फुगड्या खेळण्यात महिला दंग होऊन गेल्या होत्या.

## नवले ब्रिज येथील वेश्या व्यवसाय बंद करा

नऱ्हेतील गुन्हेगारीस आळा घालावा : भूपेंद्र मोरे यांचे सिंहगड रोड पोलीस स्टेशनला निवेदन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे हे नावाजलेले गाव आहे. इथे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या आहे. ह्याशिवाय विविध शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल, इंडस्ट्रियल एरिया यांचेही क्षेत्र आहे.

मात्र गेल्या काही दिवसापासून ह्या भागात सातत्याने गुन्हेगारीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे व्यतीत होत सामजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी सिंहगड रोड पोलीस स्टेशनकडे निवेदन देत या भागातील गुन्हेगारी कोयता गँग ची होणारी दहशत ह्या बाबत तत्काळ ठोस कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

पुढे त्यांनी निवेदनात मागील काही दिवसांपूर्वी गोकुळ नगर भागामध्ये कोयता गँगने धुडगूस घालत वाहनांची तोडफोड केली.

त्यानंतर एकास जीवघेणा हल्ला झाला.त्यावेळी कोयता तसेच तलवारी व अन्य धारदार शस्त्र बाळगून धुडगूस घालत आहेत. यामुळे या भागातील नागरिक प्रचंड भयभीत झाले आणि दहशतीखाली जगत आहेत.ह्यातून एखाद्या निष्पाप व्यक्तीचा बळीही जाऊ शकतो. तातडीने कारवाई करत गुन्हेगारी मुक्त नऱ्हे परिसर करावा अशी मागणी मोरे यांनी केली. याशिवाय नवले ब्रीज परिसरात खुलेआम वेश्या व्यवसाय सुरू आहे.

अनेक पुरावे देऊनही पोलिसांकडून कारवाई झाली नाही. ह्या भागात येणाऱ्या जाणाऱ्या महिला भगिनी व विद्यार्थी यांना प्रचंड मनस्ताप आहे. याबाबत ही कार्यवाही करावी अशी मागणी मोरे यांनी सिंहगड रोड वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप धाईंगडे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

मोरे यांच्या निवेदनातील सर्व बाबीवर तातडीने कारवाई करण्यात येईल असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप धाईंगडे यांनी सांगितले.



- नऱ्हे परिसरातील गुन्हेगारीस प्रतिबंध घालण्यासाठी दिलीप दाइगंडे यांना निवेदन देताना भूपेंद्र मोरे

# मिसेस इंडिया एम्प्रेस ऑफ द नेशन - सिझन ६

**जिथे महिलांनी स्वप्न पाहिली, फायनलिस्ट्सनी धाडस दाखवलं आणि विजेत्यांनी चकाकी गाजवली**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मिसेस इंडिया एम्प्रेस ऑफ द नेशन 2025 सिझन 6 चा ग्रँड फिनाले — संस्थापक कार्ल आणि अंजना मस्करेन्हास यांची संकल्पना — 29 जून 2025 रोजी पुण्यातील आलिशान हयात हॉटेलमध्ये भव्यतेने पार पडला. हा शो EthoSki Skincare ने सादर केला होता आणि संजीवनी हॉस्पिटलसोबत भागीदारीत आयोजित केला होता. DIVA Pageants (www. divapageants.com) यांच्याद्वारे आयोजित, या स्पर्धेत भारतभरातून 53 फायनलिस्ट्स सहभागी झाल्या होत्या आणि ओळख, नवसर्जन व ध्येय यांचा गौरव करण्यात आला.




बॉलीवूड अभिनेते रोहित रॉय आणि तनिषा मुखर्जी यांच्या उपस्थितीमुळे संध्याकाळ अधिक तेजस्वी झाली. या खास प्रसंगी निर्णय मंडळात प्राची मिश्रा, डॉ. स्वेता कार्लापुडी, डॉ. शिल्पा पाटील, निशा जमवाल, संदीप सिंग आणि कार्ल मस्करेन्हास यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे निवेदन सौंदर्य आणि आत्मविश्वासाने सिमरन आहुजा यांनी केले.

अंजना आणि कार्ल मस्करेन्हास यांच्या मार्गदर्शनाखाली — डॉ. शिल्पा पाटील आणि डॉ. स्वेता कार्लापुडी यांच्या मास्टरक्लासेसद्वारे — फायनलिस्ट्सना आत्मविश्वास, आरोग्य आणि मंचावरची उपस्थिती यांचे प्रशिक्षण दिले गेले. सिसिलिया सान्याल यांनी डायनिंग एटीकेटच्या बारकाव्यांची ओळख करून दिली. पूजा सिंह यांचं कोरिओग्राफीमुळे प्रत्येक सेगमेंटने प्रेक्षकांची मनं जिंकली.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शक्य झाले ते समर्पित टीमच्या अथक मेहनतीमुळे — सिसिलिया सान्याल, मृणालिनी भारद्वाज, स्पेंटा पटेल, मृणाली तायडे आणि साए खलाटे — जे पडद्यामागे उत्कृष्ट कामगिरी करत होते.

मिसेस इंडिया एम्प्रेस ऑफ द नेशन ने पुन्हा एकदा सिद्ध केलं की हे केवळ एक स्पर्धा नसून महिलांसाठी बदल घडवणारा एक मंच आहे — जिथे त्या खरोखरच DareDreamDazzle करतात.



## थोडक्यात



### प्रवीण बागडे 'विकसित कृषी संकल्प अभियान २०२५' करीता सन्मानित

नागपुर (आरंभ पर्व) : महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (माफसु) च्या विस्तार शिक्षण विभागात कार्यरत स्विय सहायक प्रवीण बागडे यांना 29 मे ते 12 जून 2025 दरम्यान केंद्र सरकारच्या 'विकसित कृषी संकल्प अभियान 2025' चा विद्यापीठाचा अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी डॉ. अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण यांच्या निरोप संमारंभ प्रसंगी पुष्पगुच्छ आणि सम्मानपत्र प्रदान करुन सन्मानित करण्यात आले. यापूर्वी सुध्दा त्यांच्या उल्लेखनीय कार्य, उत्साह आणि निष्ठेसाठी 'उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार' आणि 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार' प्रदान करुन गौरविण्यात आले. त्यांच्या लागोपाठ यशस्वी प्रयत्नांचे फार कौतुक केले जाते. देशभर 'विकसित कृषी संकल्प अभियान' हा राष्ट्रीय अभियान सुरु करण्यात आला होता, जो भारतीय कृषीला वैज्ञानिक पद्धती, शाश्वत पद्धती आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाच्या माध्यमातून अद्यावत करण्यासाठी झोकून दिले. ज्याचे मार्गदर्शन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री, मा. श्री. शिवराज सिंह चौहान आणि भारतीय कृषी संशोधन परिषद (भाकृअप) यांनी कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पाडले. याप्रसंगी विस्तार विभागाचे तांत्रिक अधिकारी डॉ. गीतांजली ढुमे, डॉ. सारीपुत लांडगे, श्री मोहन कापसे, गौरी भदोरिया यांना सुध्दा त्यांच्या समर्पित कार्याबद्दल आयोजित कार्यक्रमात पुष्पगुच्छ आणि सम्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



### लोकमान्य हॉस्पिटल्सची महत्त्वाकांक्षी विस्तार योजना

पुणे (आरंभ पर्व) : रोबोटिक प्रणालीच्या साहाय्याने सांधेरोपण शस्त्रक्रियेमध्ये आशियातील अग्रगण्य रूग्णालय असलेल्या व ५० हुन अधिक वर्षांचा वारसा असलेल्या लोकमान्य हॉस्पिटल्सने उनाप्राईम हेल्थकेअर एलएलपी ने केलेल्या गुंतवणूकीसह धोरणात्मक विस्ताराची घोषणा केली. उनाप्राईम इनव्हेस्टमेंट ॲडव्हायझर्स ने स्थापित केलेल्या स्पेशल पर्पझ व्हेईकल (एपीव्ही) च्या माध्यमातून महाराष्ट्र स्थित व रूग्णालयांची साखळी असलेल्या लोकमान्य हॉस्पिटल्समध्ये सुमारे 84.5 टक्के हिस्सा संपादित केला आहे. यामुळे महाराष्ट्रातील सर्वात आधुनिक मल्टीस्पेशालिटी व क्वार्टनरी केअर रुग्णालय साखळ्यांपैकी पैकी एक अशी ओळख निर्माण होईल. या व्यवहारात टाटा हेल्थ केअर फंडकडे असलेल्या पूर्वीच्या हिस्सेदारीचे उनाप्राईम हेल्थकेअर एलएलपी तर्फे संपादन आणि संस्थेच्या महत्त्वाकांक्षी विस्तार योजनांना बळ देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्राथमिक भांडवल उभारणीचा समावेश आहे. उनाप्राईम हेल्थकेअर एलएलपीला प्रख्यात देशांतर्गत संस्थांचे पाठबळ असून यामध्ये भारतात बहु-अवयव प्रत्यारोपण आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेले ग्लोबल हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.के.रविंद्रनाथ आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ञ श्री.मनप्रीत सोहल यांचा समावेश आहे. लोकमान्य हॉस्पिटल्सचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक मनप्रीत सोहल यांच्या धोरणात्मक नेतृत्वाखाली आणि लोकमान्य हॉस्पिटल्सचे अध्यक्ष व मुख्य सांधेरोपण शल्यचिकित्सक डॉ.नरेंद्र वैद्य आणि अवयव प्रत्यारोपण प्रणेते डॉ.के रविंद्रनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमान्य हॉस्पिटल्सने महत्त्वकांक्षी विस्तार योजना आखली आहे. यामध्ये पुढील 3 ते 4 वर्षात 300 बेडस पासून 800 बेडसपर्यंतचा विस्तार, त्याचबरोबर हृदयरोग चिकित्साशास्त्र (कार्डियाक सायन्सेस), मज्जातंतू शास्त्र (न्युरोसायन्सेस), व्यापक कर्करोग उपचार, जनरल व जीआय सर्जरी आणि बहु-अवयव प्रत्यारोपण यासाठी पुणे आणि महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जागतिक दर्जाचे उत्कृष्टता केंद्रे यांचा समावेश आहे.

# धायरीत शनिवारी भव्य जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथे पाच जुलै शनिवार रोजी भक्तगणासाठी इस्कॉन व अखिल धायरी ग्रामस्थ यांच्या वतीने जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पाच जुलै रोजी ही रथयात्रा संपन्न होणार आहे.

धायरी व परिसरामध्ये अनेक श्रीकृष्ण भक्त यांचा अधिवास आहे. त्यांच्यासाठी ही एक पर्वणी ठरणार आहे.

जगन्नाथ रथयात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या भक्त भक्तगणाला आशीर्वाद मिळतो अशी आख्यायिका आहे.

रथयात्रेत सहभागी होऊन रथ ओढण्याची संधी मिळणे हे देवाचे आशीर्वाद मानले जातात. असे मानले जाते की यामुळे जीवनातील सर्व पापांचा नाश होतो आणि मोक्ष मिळतो. म्हणून जगन्नाथाचा रथ ओढण्यासाठी भाविकांची चढाओढ सुरु असते.

भक्त या जगन्नाथ रथयात्रेमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात. या जगनाथ रथयात्रेसाठी माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. जगन्नाथ रथ यात्रेचे हे चौथे वर्ष आहे..

इस्कॉन व अखिल धायरी ग्रामस्थ स्वामी जगन्नाथ रथयात्रा महोत्सव यांच्या वतीने दुपारी तीन ते रात्री आठ वाजता रायकर मळा ते धारेश्वर मंदिर अशी भव्य दिव्य जगन्नाथ रथयात्रा निघणार आहे. श्रीमान महावीर्य प्रभुजी यांचे प्रवचन होणार आहे. याशिवाय प्रबोधनात्मक किर्तन प्रवचन व जगन्नाथ रथ दर्शन असे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

याशिवाय रात्री आठ नंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. जगनाथ रथयात्रेच्या सोहळ्याच्या निमित्त धायरी मध्ये विविध कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.त्यामध्ये प्रबोधनात्मक प्रवचन ,व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या रथयात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असं आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सहा लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास मोफत वाळू वाटप

**कर्जत (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान आवास योजनेतून सर्वांसाठी घरे या योजनेतंर्गत महसूल विभागामार्फत कर्जत तालुक्यातील सहा घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ ब्रासप्रमाणे ३० ब्रास मोफत वाळूचे वितरण केले आहे. घरकुल लाभार्थ्यांना मोफत ऑनलाईन पद्धतीने वाटप करण्यात आले असल्याचे तहसीलदार गुरू बिराजदार यांनी सांगितले. घरकुलांसाठी मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी लाभार्थ्यांची होती. त्यानुसार महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडून ३० एप्रिल २०२५ रोजी घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून देण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे. दरम्यान, या निर्णयाची कर्जत तहसीलदार गुरू बिराजदार यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन केले आहे. कर्जत तालुक्यातील चापडगाव येथून तीस ब्रास वाळू साठा तहसीलदार गुरू बिराजदार यांच्या पथकाने जप्त केला होता. हा वाळू साठा तहसील कार्यालयात ठेवण्यात आला होता. या जप्त वाळू साठयातून तहसीलदार गुरू बिराजदार यांनी सहा

लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू वाटप केली आहे. ही वाळू वाटप करताना तहसीलदार गुरू बिराजदार, निवासी नायब तहसीलदार महादेव कांरडे, नायब तहसीलदार प्रितम ठोंबरे व लाभार्थी यावेळी उपस्थित होते.

**पाच ब्रास वाळू लाभार्थींना मिळणार**

पंतप्रधान आवास योजना-२०२२ सर्वांसाठी घरे या योजनेतंर्गत कर्जत तालुक्यातील लाभार्थ्यांना मोफत घरकुले मंजूर झाली आहेत. त्यामुळे प्रत्येक लाभार्थी यांना पाच ब्रास वाळू मोफत वाटप करण्यात येणार आहे.

- गुरू बिराजदार, तहसीलदार कर्जत

## नऱ्हेतील साफसफाई सुरू

- मोरे यांनी विविध मागण्यासाठी केले होते चक्काजाम आंदोलन
- नागरिकाकडून भूपेंद्र मोरे व पालिका प्रशासनाचे आभार







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हेतील विविध भागातील परिसरात अस्ताव्यस्त कचऱ्यानी विद्रूपीकरण झाले होते. याशिवाय" स्वच्छ" संस्थेचे वेगवेगळ्या पॉईंटवर ही प्रचंड प्रमाणात दुर्गंधी येत होती. याबाबत खडकवासला राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी नागरिक समस्या विषयी चक्काजाम आंदोलन केले होते. याशिवाय महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या सोबत बैठकीमध्ये नऱ्हे परिसरातील कचऱ्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. याबाबत मागणी केली होती. त्यानंतर सिंहगड रोड क्षत्रिय कार्यालय याबाबतने तातडीने कार्यवाही करण्यास सुरुवात केली. आज नऱ्हे परिसरामध्ये सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य निरीक्षक माने,कुणाल मते, नासिर शेख यांनी साफसफाई कर्मचाऱ्यांसोबत संपूर्ण परिसराची स्वच्छता अभियान मोहीम सुरू केली.

**१५ दिवसांत कामे न झाल्यास मुंबई बंगलोर महामार्गावर रस्ता रोको करणार असल्याचा निर्वाणीचा इशारा नऱ्हेग्रामवासीयांनी काय दिला? प्रशासन कामाला लागले. परंतु अधिकारी व कर्मचारी तसेच सिंहगडरोड क्षेत्रीय कार्यालय खासकरून नऱ्हेकरांचेही मनापासून आभार.**

- श्री. भूपेंद्र मुरलीधर मोरे, सामाजिक कार्यकर्ते

**नऱ्हे व परिसरातील सर्व रस्त्यावर स्वच्छता मोहीम सुरू केली आहे.ह्याबाबत श्री. भूपेंद्र मोरे यांनी मागणी केली होती. स्वच्छता मोहिमेमध्ये कचरा राडाराडा, उचलला जात आहे . आगामी काळात परिसर स्वच्छ राहील यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत**

- प्रज्ञा पोतदार-पवार सहाय्यक आयुक्त

सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी गोकुळ नगर कृष्णाई नगर परिसरातील साफसफाई कामाची पाहणी केली. व काही सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या. भूपेंद्र मोरे यांनी केलेल्या चक्काजाम आंदोलनानंतर पुणे महानगरपालिका ताळ्यावर आल्याचे चित्र दिसून येत आहे. परिसरातील नागरिकांनी मोरे व पालिका प्रशासन यांचे आभार मानले.

## प्रसन्नदादा मित्र परिवारातर्फे ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो या दिव्यदृष्टीतून ॲड प्रसन्नदादा जगताप मित्रपरिवार दरवर्षी पावसाळ्यामध्ये छत्रींचे वाटप करत असतात. खडकवासला ग्रामीण भाग, सिंहगड रोड परिसर अशा विविध भागात गरजवंत कष्टकरी व विद्यार्थी अशा गरजवंतांना 22 वर्षापासून छत्री वाटप करण्यात येत आहे. त्याचबरोबर अनेक शाळांमध्येही ॲड प्रसन्नदादा जगताप परिवार यांच्या वतीने छत्री वाटप करण्यात आले आहे. याही वर्षी छत्री वाटप उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. हिंगणे येथील ॲड प्रसन्न दादा जगताप यांच्या संपर्क कार्यालय येथे छत्री वाटप अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. ॲड. प्रसन्न दादा जगताप मित्रपरिवार यांच्यातर्फे गरजवंत नागरिकांची विद्यार्थ्यांची पावसाळ्यामध्ये सोय व्हावी ह्या सामाजिक जाणिवेपोटी छत्री वाटप करण्यात आले.

सिंहगड रोड भागाचे हक्काचे नेतृत्व म्हणून ओळख असलेले माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्या दूरदृष्टीतून हा उपक्रम 22 वर्षापासून दरवर्षी आयोजित केला जातो. सिंहगड रोड परिसरातील हजारो जेष्ठ नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले आहे.

ॲड प्रसन्नदादा जगताप, म्हणाले ज्येष्ठ नागरिक विद्यार्थी कष्टकरी कामगार यांना पावसाळ्यामध्ये फिरताना अडचणीचा सामना करावा लागतो त्यासाठी छत्री वाटप करण्यात आले.नागरिकांची सेवा हा आशीर्वाद समजून आम्ही काम करत आलो आहोत..

ॲड प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराने केलेल्या छत्री वाटपाबद्दल ज्येष्ठ नागरिकांनी कौतुक व्यक्त केले. यावेळी परिसरातील अनेक ज्येष्ठ नागरिक बंधू भगिनी उपस्थित होते.

## कोकणातील शेतीला सोलार पंप किंवा वीज कनेक्शन मिळणं गरजेचं

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेल्या सोलार पंप व वीज कनेक्शनचा प्रश्न आमदार शेखर निकम यांनी विधानसभेत मांडला. ते म्हणाले, "आतापर्यंत जिल्ह्यात फक्त २५ सोलार पंप वाटप झाले असून ३०३ अर्ज प्रलंबित आहेत.

याशिवाय अनेक शेतकऱ्यांकडे लहान लहान सातबारा असल्यामुळे तांत्रिक कारणामुळे सोलार योजनेचा लाभ मिळत नाही.""कोकणात चार महिने पावसाचे प्रमाण जास्त असल्याने अनेक ठिकाणी सोलार पंप फायदेशीर ठरत नाहीत. त्यामुळे नारळ व पोफळीच्या बागांमध्ये असलेल्या बोरवेलसाठी वीज कनेक्शन मिळणं अत्यावश्यक आहे," असे त्यांनी नम्रपणे सांगितले. त्यांनी



शासनाचे लक्ष वेधत म्हटले की, महाराष्ट्राचा एकूण कोटा न पाहता जिल्ह्यानिहाय लोकसंख्येनुसार सोलार वाटपाचे धोरण ठरवावे, तसेच जे अर्ज प्रलंबित आहेत, त्यांचा विचार करून शेतकऱ्यांना सोलार किंवा वीज कनेक्शन मिळावे."या मागण्या शासनाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेसाठी मांडत," आमदार शेखर निकम यांनी शेतकऱ्यांच्या भावना सभागृहात मांडल्या.

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या हैदराबादमधील एकात्मिक उत्पादन सुविधेचे उद्घाटन

- ३.४५ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेली ही एकात्मिक सुविधा, सोने शुद्धीकरण, आभूषण रचना आणि दागिने निर्मिती एकाच छताखाली आणून जागतिक अग्रणी उत्पादक म्हणून स्थान मजबूत करेल
- २,७५० हून अधिक कारागीर आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधन व विकासाच्या समर्थनासह, ही सुविधा मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या जागतिक किरकोळ विस्ताराला चालना देईल
- वर्षाकाठी ४.७ टन सोन्याचे दागिने आणि १.८ लाख कॅरेट हिऱ्यांचे दागिने तयार करण्याची सुविधेची क्षमता



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगभरात १३ देशांमध्ये ४०० हून अधिक विक्री दालनांसह जागतिक स्तरावरील पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठे दागिने विक्रेते असलेल्या, मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने तेलंगणातील हैदराबाद येथे त्यांची अत्याधुनिक, पूर्णपणे एकात्मिक अशी या प्रकारातील सर्वात मोठी दागिने उत्पादन सुविधा सुरू केली आहे. रंगा रेड्डी जिल्ह्यातील महेश्वरम येथील जनरल पार्क येथे स्थित आणि ३.४५ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे अशा प्रकारचे पहिले एकात्मिक उत्पादन केंद्र आहे, जे भारत आणि आखाती देशांमध्ये समूहाच्या कार्यरत असलेल्या १४ उत्पादन सुविधांमध्ये सर्वात मोठे देखील आहे.

या एकात्मिक उत्पादन सुविधेमुळे आभूषण रचना, सोने शुद्धीकरण, दागिने निर्मिती, गुणवत्ता हमी, हॉलमार्किंग, वेअरहाऊसिंग आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यासारखी सर्व महत्त्वाची कार्य एकाच छताखाली आणली गेली आहेत.

या केंद्राची वार्षिक उत्पादन क्षमता ४.७ टनांहून अधिक सोन्याचे दागिने आणि १.८ लाख कॅरेट हिऱ्यांचे दागिने निर्मितीची आहे, तसेच वार्षिक सोन्याची शुद्धीकरण क्षमता ७८ टन आहे.

१८ राज्यांमधून २,७५० हून अधिक कुशल कारागिरांना रोजगार संधी या केंद्राने दिल्या असून, कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, कल्याण आणि सोयही सुनिश्चित केली आहे. या सुविधेमधील ४० टक्के कर्मचारी हे स्थानिक परिसरांतून भरती केले गेले आहेत आणि एकूण पुरुष-महिला गुणोत्तर ८० मागे २० असे राखले गेले आहे.

तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री रेवंत रेड्डी यांनी या नवीन जनरल पार्क सुविधेचे अधिकृत उद्घाटन मलाबार समूहाचे अध्यक्ष श्री एम.पी. अहमद; उपाध्यक्ष श्री अब्दुल सलाम के.पी; मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या भारतातील कारभाराचे व्यवस्थापकीय संचालक श्री आशर ओ; कार्यकारी संचालक श्री निषाद ए.के. यांच्या उपस्थितीत मलाबार समूहाचे इतर वरिष्ठ व्यवस्थापकीय संघातील सदस्य, तेलंगणा सरकारमधील मान्यवर आणि हितचिंतक यांच्या उपस्थितीत केले.

वाढीव उत्पादन क्षमतांमुळे 'मेक इन इंडिया, मार्केट टू द वर्ल्ड' या दृष्टिकोनानुसार भारत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत समूहाच्या आक्रमक किरकोळ विक्री विस्तारालाही यातून चालना मिळेल.

मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची एकूण वार्षिक उत्पादन क्षमता अनुक्रमे ४०.६८ टन आणि ३.६१ लाख कॅरेटपेक्षा जास्त आहे. ज्यामुळे ती जगातील सर्वात मोठ्या दागिन्यांच्या निर्मात्यांपैकी एक बनली आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.